# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:25.06.2026** **वार:गुरुवार**

1. राज्यातील सर्व शेतकऱ्यांना या वर्षअखेर पर्यंत दिवसा वीज पुरवठा देण्याचा शासनाचा प्रयत्न
2. महिला सुरक्षेसंदर्भातील कायद्यामध्ये आवश्यक सुधारणांसाठी महिला सदस्यांची समिती स्थापन करणार असल्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा
3. बाल विवाह आणि बाल मृत्यू रोखण्यासाठी विशेष उपाययोजना राबवत असल्याची महिला बालविकास मंत्र्यांची विधीमंडळात माहिती आणि
4. राज्यात मोसमी पावसाला सुरुवात झाली असली, तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये - कृषीमंत्र्यांचा सल्ला

**विधानपरिषद**

राज्यातील 75 टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा केला जात आहे, या वर्षाअखेरीस उर्वरित 25 टक्के शेतकऱ्यांनाही दिवसा वीजपुरवठ्याच्या कक्षेत आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. राज्यात सध्या वीजेची कोणतीही टंचाई नसून कृषी पंपांना नियमानुसार दिवसा आठ तास वीजपुरवठा केला जात असल्याचं त्यांनी सांगितलं. देशातील एकंदर सौर कृषी पंपांपैकी 60 टक्के पंप महाराष्ट्रात बसवण्यात आले आहेत, केंद्र सरकारनं सर्व राज्यांना महाराष्ट्राचं अनुकरण करण्याबाबत पत्र पाठवलं आहे, अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली.

नाशिकमध्ये TCS कंपनीत झालेला महिला कर्मचाऱ्यांचा विनयभंग, लैंगिक अत्याचार, धार्मिक भावना दुखावल्याचं प्रकरण, अशा घटनांचा अभ्यास करण्यासाठी आणि महिला सुरक्षेसंदर्भातील कायद्यांच्या पुनरावलोकनासाठी महिला सदस्यांची समिती स्थापन करणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी काल विधानपरिषदेत दिली. चित्रा वाघ यांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता, त्यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले....

**या संदर्भात काही कायदे निश्चित आहेत पण त्याचं योग्य त्या प्रमाणात पालन होत नाही. आणि म्हणून आत्ता काही उपाययोजना चित्रा त्यांनी या ठिकाणी सुचवलेल्या आहेत. मी तर असं म्हणेन की आपल्या आणि अध्यक्षांच्या मान्यतेने दोन्ही सभागृहातल्या महिला सदस्यांची एक कमिटी तयार करून आणि आत्ता उपस्थित असलेले कायदे आणि नियम याचा अभ्यास करणे त्याच्यामध्ये काय बदल केला पाहिजे? विशेषतः आपण जेव्हा हे कायदे तयार केले त्यावेळेस प्रायट वर्क प्लेस, इतक्या मोठ्या प्रमाणात नव्हत्या. जेव्हा हे कायदे तयार केले त्यावेळेस आपल्याकडे रात्रीच्या शिफ्ट ला महिला कमी काम करत होत्या. त्यामुळे आता आपल्याला त्याच्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. आणि म्हणून दोन्ही सभागृहाची महिला सदस्यांची एक कमिटी तयार करून त्यांना ही जबाबदारी आपण देऊ या सगळ्या कायद्यांचा, नियमांचा झालेल्या घटनांचा आढावा घेऊन आपण काय उपाययोजना करणं आवश्यक आहे. त्या उपाययोजना त्यांनी सुचवाव्या निश्चितपणे राज्य सरकार त्या उपाययोजना त्या ठिकाणी लागू करेल.**

परिवहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर शासनानं सकारात्मक भूमिका घेतल्यानं आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप मागे घेण्यात आला आहे; अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काल विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. परिवहन विभागातल्या कर्मचारी संघटनांनी विविध मागण्यांसाठी 16 जूनपासून बेमुदत संप पुकारला होता.

**<u>विधानसभा-शिरोळे</u>**

राज्यात बालविवाहाचं प्रमाण 10 टक्क्यांच्या आत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत, हे प्रमाण जास्त असलेल्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहीम राबवण्यात येत असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी काल विधानसभेत दिली. यासाठी लग्न पत्रिकेत वर आणि वधूची जन्मतारीख नमूद करण्यासाठी विधी आणि न्याय तसंच ग्रामविकास विभागांच्या मदतीनं कार्यवाही करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या वर्षी राज्यात सुमारे पंधराशे आणि यंदाच्या वर्षात आतापर्यंत चौदशेहून अधिक बालविवाह रोखण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यातील बालमृत्यूचं प्रमाण कमी करण्यासाठी सरकारकडून विविध उपाययोजना सुरू असल्याची माहितीही सरकारनं काल विधानसभेत लेखी उत्तरात दिली.

राज्याच्या काही भागांमध्ये मान्सूनला सुरुवात झाली असली, तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत एका चर्चेला उत्तर देताना दिला. शेतकऱ्यांनी प्रथम आपल्या शेतातली ओलाव्याची पातळी तपासून, पुरेसा ओलावा असल्याची खात्री झाल्यावरच पेरणी करावी. एल निनोसह हवामानातल्या इतर अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी विभाग मदत करेल असं आश्वासनही भरणे यांनी दिलं.

दरम्यान, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शोक प्रस्ताव वाचताना झालेल्या चुकांबद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी काल दिलगिरी व्यक्त केली. छापील भाषणाची प्रत अस्पष्ट असल्यानं वाचताना चूक झाल्याचं ते म्हणाले. तत्पूर्वी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत झालेल्या अनियमिततेच्या निषेधार्थ विरोधी पक्ष सदस्यांनी विधान भवन परिसरात निदर्शनं केली.

**<u>आषाढी वारी-मुख्यमंत्री</u>**

यंदाच्या आषाढी वारीत भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून व्यापक नियोजन करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या. विधानभवनात काल त्यांच्या अध्यक्षतेखाली पंढरपूरच्या आषाढी एकादशीच्या अनुषंगानं आढावा बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. वारीचा उपक्रम डिस्कव्हरी आणि जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे जगभरात पोहोचणार असल्याचं त्यांनी सांगितलं. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी जर्मन हॅंगर उभारण्यात आले असून त्यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

**<u>मुक्ताबाई पालखी-जळगांव</u>**

संत मुक्ताबाईंच्या पालखीनं काल जळगाव जिल्ह्यातल्या मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी इथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलं. विठ्ठलनामाचा जयघोष आणि टाळ मृदंगाचा गजर अशा भक्तिमय वातावरणात हा प्रस्थान सोहळा पार पडला.

**<u>संविधान हत्या दिवस</u>**

1975 मध्ये आजच्या दिवशी देशात आणीबाणी लागू करण्यात आली होती. त्या घटनेचं स्मरण म्हणून आज संविधान हत्या दिवस पाळला जात आहे. आणीबाणीच्या काळात देशासाठी प्राण गमावलेल्या व्यक्तींना श्रध्दांजली अर्पण

करण्यासाठी तसंच संविधानाचं आणि लोकशाहीचं मूल्य नागारिकांना समजावं यासाठी आज देशभरात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>पु.ल.स्मृतीमहोत्सव</u>**

पुण्यातील आशय सांस्कृतिक च्या वतीने आणि 'पु. ल. परिवारा'च्या सहयोगाने आयोजित पु. ल. स्मृती महोत्सवाचं उद्घाटन काल तालयोगी पंडित सुरेश तळवलकर यांच्या हस्ते झालं. उद्‌घाटन समारंभापूर्वी 'या सम हा' या लघुपट प्रदर्शित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अखेरच्या सत्रात 'बहुरूपी पु. ल.' या विषयावर विशेष परिसंवाद झाला.

**<u>अण्णा हजारे-अहिल्यानगर</u>**

माहिती कायद्यात केलेल्या दुरुस्त्या रद्द करण्याच्या मागणीसाठी पाच जुलै रोजी उपोषण करण्याचा इशारा जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिला आहे. या संदर्भात राज्याचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी काल अण्णांची राळेगणसिद्धी इथं भेट घेतली. मात्र ही बैठक निष्फळ ठरली असून, आपण उपोषणावर ठाम असल्याचं अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे.

**<u>सावंत-देसाई भेट</u>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे 6 खासदार पक्षातून बाहेर पडल्याप्रकरणी खासदार अरविंद सावंत आणि अनिल देसाई यांनी काल लोकसभा सभापती ओम बिरला यांची भेट घेतली. एका पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेले खासदार दुसऱ्या पक्षात जाऊ शकत नाहीत, त्यांची संख्या पक्षाच्या एकूण खासदारांच्या दोन तृतीयांश असली तरीही संविधानातल्या 10व्या अनुसूचीतल्या तरतुदीनुसार हे करता येणार नाही असं आपण सभापती बिरला यांना सांगितल्याची माहिती अनिल देसाई यांनी वार्ताहरांना दिली. या प्रकरणी सभापती संविधान आणि लोकशाहीचा आदर करणारा निर्णय घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<u>सहकार सप्ताह</u>**

केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला पाच वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त 21 जून ते 6 जुलै  या कालावधीत सहकार सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या कालावधीत राज्य सहकारी संघ आणि राज्य शासनाच्या सहकार खात्यानं जनजागृतीचे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. सहकारी चळवळीचं राष्ट्र विकासातील योगदान तसंच सहकार मंत्रालयाच्या विविध उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा या सप्ताहाचा उद्देश आहे.

**<u>पुरस्कार</u>**

राज्य शासनाचे 2023-24 आणि 2024-25 चे वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार गडचिरोली जिल्ह्यातल्या तीन शेतकऱ्यांना जाहीर झाले आहेत. 2023-24 साठीचा सर्वसाधारण गटातला पुरस्कार आरमोरी तालुक्यातल्या विष्णूपद गाईन यांना, तर आदिवासी गटातला पुरस्कार एटापल्ली तालुक्यातल्या दयाराम सिडाम यांना जाहीर झाला आहे. 2024-25 साठीचा पुरस्कार सर्वसाधारण गटात आरमोरी तालुक्यातल्या पुरुषोत्तम जांभूळकर यांना जाहीर झाला आहे.

**<u>पाऊस</u>**

नैर्ऋत्य मोसमी पावसानं राज्याच्या बहुतांश भागात हजेरी लावली असून मुंबईसह अनेक ठिकाणी कालपासून पावसाची संततधार आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात पुढचे तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागान व्यक्त केली आहे.  मासेमार आणि नागरिकांनी सतर्क राहण्याच आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**रायगड** जिल्ह्यातही गेले दोन दिवस जोरदार पाऊस पडला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. अलिबाग तालुक्यात झालेल्या जोरदार पावसामुळे काल देहेन गावाजवळील बंधारा वाहून गेला. यामुळे या गावाचा इतर गावांशी संपर्क तुटला आहे.

**रत्नागिरी**मध्ये फगरवठार इथे 70 फुटी संरक्षक भिंत काल कोसळली. लांजा तालुक्यातल्या आरगावात बांध कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला.

**परभणी, जालना आणि यवतमाळ** जिल्ह्यासह मराठवाड्यातील काही भागातही पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.

**हवामान**

राज्याच्या अनेक भागात मान्सून सक्रिय झाला असून, येत्या आठवड्यात विविध भागात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात 30 जूनपर्यंत तर मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात 26 आणि 27 जूनला जोमदार पाऊस पडेल असा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.